0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वडाळा पोलिस ठाणे, मुंबई यांचेकडून दिनांक ०८/१०/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे व तद्नंतर दिनांक १७/१०/२०१२ रोजी प्राप्त झालेला परिपूर्ण अहवाल.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६८/२०१२/जा.७३१, दिनांक १७/१०/२०१२, ०३/११/२०१२ व २२/११/२०१२.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वडाळा पोलिस ठाणे, मुंबई यांचे दि.३१/१०/२०१२ रोजीचे अभिवेदन

४) मोटर टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ चा मालक मोहम्मद जहिर सुभराती याचे दिनांक ३१/१०/२०१२ रोजी प्राप्त लेखी निवेदन.

५) मे. राजपुत कॅरियर्स तथा टँकर क्र. एमएच-०४-सीए-९७५५ चे मालक यांचे दिनांक ३१/१०/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

६) मे. युनायटेड इंडस्ट्रिस यांचे दिनांक ०२/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

७) टँकर क्र. एमएच-०४-सीए-९७५५ चा चालक राजेंद्र सिंह याचे दिनांक ०३/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

८) मे. राजपुत कॅरियर्सचे मॅनेजर यांचे दिनांक ०८/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

९) मे. ब्रिजदा रोडलाईन्स प्रा.लि. तथा टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ चे मालक यांचे दिनांक ०९/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

१०) मे. युनायटेड इंडस्ट्रिस यांचे दिनांक १७/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

११) मे. युनायटेड इंडस्ट्रिस यांचे दिनांक २०/११/२०१२ रोजीचे लेखी निवेदन.

१२) हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे दिनांक २१/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

१३) मे. विकास बल्क करिअर्स यांचे दिनांक ०६/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

१४) मे. साह पेट्रोलिय लि. यांचे दिनांक १३/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

१५) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वडाळा पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २५/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त पत्रासोबत रासायनिक पृथ:करण अहवालाची छायांकित प्रत.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६८/२०१२/जा. १८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.
दिनांक : 03 / 01 / 2013

## आ दे श

**(जीवनावश्यक वस्तू क़ायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

0002

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २४/०९/२०१२ रोजी गोदरेज कंपनीच्या पाठीमागे नॉलेज सेंटर रोड, जुने बीपीटी सब स्टेशन, वडाळा पूर्व, मुंबई ३७ या ठिकाणी छापा टाकावयाचा असल्याचे सहाय्यक पोलिस आयुक्त वडाळा विभाग श्री. वाघमारे यांनी सांगितल्याने पोउनि श्री. हिंदुराव गुलाबराव भिलारे, सपोनि तोरणे, पोउनि मंडले, पोह २२३६०, पोना २७१७०, पोशि ०७१३४६/व.वि असे गोदरेज जंक्शन येथे पोहचले. सदर ठिकाणी वपोनि श्री. इंगुले, वपोनि श्री. भरत गायकवाड, पोउनि मराठे, शिवडी पोलिस ठाणे हे हजर होते. सहाय्यक पोलिस आयुक्त वडाळा विभाग यांनी त्यांना खात्रीलायक बातमीदारामार्फत मिळालेल्या माहिती नुसार वर नमूद ठिकाणी टँकरमधून तेलाची चोरी होत असल्याने पथकातील अधिकारी व अंमलदारांना वर नमूद ठिकाणी छापा टाकावयाचा असल्याचे सांगून मार्गदर्शन केले. त्यानुसार वरील पथकाने पंचांसह छापा टाकला असता, सदर ठिकाणी दक्षिणोत्तर रस्त्याच्या पूर्व बाजूस ओळीने उभे असलेल्या टँकरपैकी मोटार टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ मधून काही इसम सदर टँकरचे सिल तोडून टँकरमधून चोरुन तेल काढीत असल्याचे दिसून आले. सदर इसमांना पोलिसांची चाहूल लागल्याने इसम अंधारात पळू लागले, सदर इसमांपैकी दोन इसमांना पोलिस पथकाने शिताफीने पकडले व ताब्यात घेतले. इतर इसम घटनास्थळावरुन अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले.

सदर घटनास्थळाचे पोलिस पथकाने पंचांसह निरीक्षण केले असता, सदरचे घटनास्थळी, सब स्टेशनच्या समोर मोटार टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ हा उभा असून त्याचे समोर दक्षिण बाजूस मोटर टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ हा उभा आहे. मोटार टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ च्या पाठीमागे उत्तरेकडे एका ओळीत अनुक्रमे मोटार टँकर क्र. एमएच-०४-ईएल-६९११, एमएच-०४-ईबी-६६२३, एमएच-४३-ई-६४५१, एमएच-४३-ई-३२०५, एमएच-०४-ईवाय-७३३ असे उभे आढळले. मोटार टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ चे दक्षिणेस उभा असलेला मोटार टँकर क्र. एमएच-०४-ईएल-६९११ चे आऊटलेट व्हाल्वचे सिल तुटलेले व व्हॉल्व बॉक्स उघडे असल्याचे आढळले.

तसेच मोटार टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ व सब स्टेशनच्या मधील मोकळ्या जागेत एक निळ्या पिवळ्या रंगाचा ड्रम दिसत असून त्यावर एक पत्र्याचे चौकोनी नरसाळे दिसत असून त्याच्या बाजूस ड्रायव्हर गॅल्व्हनाईज पाईपचे तीन इंग्रजी 'L' आकाराचे बेंड दिसत आहेत. सदर ड्रमचे निरिक्षण केले असता, त्यामध्ये तेल भरलेले आढळून आले. तसेच सदर टँकरचा व्हॉल्व बॉक्स उघडा असून आऊटलेटचे झाकण उघडलेले आढळून आले व सदरच्या आऊटलेटमधून तेलाची धार आऊटलेट खाली जमीनीवर ठेवलेल्या प्लॅस्टिकच्या बादलीत पडत असल्याचे आढळून आले. आऊटलेट व्हाल्वच्या वरील बाजूस एक पांढऱ्या रंगाचा २४-२७ साईजचा रिंगपाना आढळून आला. तसेच घटनास्थळी रस्त्याचे दक्षिण व उत्तर बाजूस रस्त्यावर तेल सांडलेले दिसून आले.

पोलिस पथकाने पंचांसमक्ष जुन्या सब स्टेशनची तपासणी केली असता, सदर ठिकाणी एकूण ८ ड्रम २१५ लिटर क्षमतेचे आढळून आले असून त्यापैकी ३ ड्रममध्ये तेल भरलेले व ५ ड्रम रिकामे व त्यांची झाकणे उघडलेली दिसून आली. त्यानंतर पोलिस पथकाने पंचांसमक्ष सब स्टेशनच्या आजूबाजूच्या परिसराची पाहणी केली असता, सब स्टेशन व बी.पी.टी. च्या पूर्वेकडील सरंक्षक भिंतीच्यामध्ये तेलाने भरलेले २ ड्रम मिळून आले. घटनास्थळी मिळून आलेल्या व तेलाने भरलेल्या ६ ड्रममधून पोलिसांनी पंचासमक्ष प्रत्येकी ५०० मि.लि. इतके तेल तपासणीसाठी प्लॉस्टिकच्या बाटलीत सॅम्पल म्हणून स्वतंत्रपणे ताब्यात घेऊन त्यावर पंचांच्या सह्यांचे लेबल लावून सदरच्या बाटल्या सिलबंद केल्या.

अशाप्रकारे उपरोक्त इसमांनी संगनमत करुन मोटर टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४, एमएच-०४-डीडी-३९५५ व एमएच-०४-सीए-९७५५ मधून ज्वालाग्राही पदार्थाची लबाडीच्या इरायाने चोरी करुन ज्वालाग्राही पदार्थ विक्री करण्याचे इरायाने जवळ बाळगल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द, १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ४ व ७ तसेच २) भा.दं.वि. चे कलम ३७९, २८५ व ११४ चा भंग केल्यावरुन वडाळा पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १३५/२०१२, दिनांक २५/०९/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ अन्वये विल्हेवाटीचे आदेश पारीत करण्यासाठी या कार्यालयास कळविले आहे. तथापी, जप्त मुद्देमालामधील पंचनाम्यामध्ये नमूद केल्यानुसार घटनास्थळी मिळून आलेले टँकर, त्यामधील तेलाचा साठा तसेच इतर मुद्देमालाची किंमत दर्शविलेली नसल्याने याबाबत अहवाल सादर करण्यासाठी वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वडाळा पोलिस ठाणे, मुंबई [illegible] या कार्यालयाचे दिनांक १२/१०/२०१२ रोजीच्या पत्रान्वये कळविले असता, त्याबाबतचा अहवाल त्यांचे मार्फत दिनांक १७/१०/२०१२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे.

प्रस्तूत प्रकरणी, सदर गुन्ह्यामध्ये खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | २०० लिटर क्षमतेचे सहा तेलाने भरलेले ड्रम | १२०० लिटर | १,०८,०००/- |
| २ | मोटर टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ | १ नग | ९,९६,८००/- |
| ३ | उक्त मोटार टँकरमधील तेलाची अंदाजे किंमत | - | २६,००,०००/- |
| ४ | मोटर टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ | १ नग | ७,६६,०००/- |
| ५ | उक्त मोटार टँकरमधील तेलाची अंदाजे किंमत | - | २९,८९,४०३/- |
| ६ | मोटर टँकर क्र. एमएच-०४-सीए-९७५५ | १ नग | ६,५०,०००/- |
| ७ | उक्त मोटार टँकरमधील तेलाची अंदाजे किंमत | - | ९,७०,०००/- |
| | | एकूण | ९०,८०,२०३/- |

तसेच घटनास्थळावरुन ५ नग रिकामे लोखंडी ड्रम, १ नग पत्र्याचे नरसाळे, ३ नग इंग्रजी 'L' आकाराचे व्हॉल्व्हनाईजड पाशाचे बेंड, १ नग काळ्या रंगाची प्लास्टीक बादली, १ नग रिंगपाना H TOP कंपनीचा २४/२७ आकाराचा इ. इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

घटनास्थळावरुन तेल चोरी करणारे दोन आरोपी नईम अहमद ऐनूल्ला अहमद आणि मुक्तार दोस्त मोहमद शेख यांना पोलिस पथकाच्या मदतीने ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. गुन्ह्यातील पाहिजे आरोपी नामे कृपाशंकर महादेव सरोज, टँकर चालक यास त्याच्या राहते घरातून ताब्यात घेण्यात आले त्याचेकडे पोलिसांनी कसून चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याने त्यास सदर गुन्ह्यात अटक करण्यात येऊन त्याचा कबूली जबाब नोंद करण्यात आला असता, त्याच्या जबाबात बबलु, मुस्तफा आणि त्याचे दोन साथीदार यांचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे सांगितले आहे.

सदर गुन्ह्यातील ताब्यात घेण्यात आलेल्या मोटार टँकर व्यतिरिक्त घटनास्थळाच्या आजूबाजूस संशयीतरित्या आढळून आलेले पाच मोटार टँकर क्र. एमएच-०४-ईएल-६९११, एमएच-०४-ईबी-६६२३, एमएच-४३-ई-६४५१, एमएच-४३-ई-३२०५, एमएच-०४-ईवाय-७३३ संशयावरुन चौकशी कामी ताब्यात घेण्यात आले होते. सदर मोटार टँकरची पोलिसांनी शहा कांझी नर्सी कंपनीत नेऊन त्यांची तपासणी केली असता, कंपनीचे अधिकारी विनोद शहा आणि जिओ-केम कंपनीचे सर्वेअर श्री. शामकुमार सिंग यांनी तपासणी केली असता, सदर पाचही मोटार टँकरचे सिल व्यवस्थित असल्याचे तसेच त्याचे वजन करुन त्यातून चोरी झाली नसल्याचा स्पष्ट लेखी अहवाल पोलिसांना प्राप्त झाल्याने पोलिसांनी सदर मोटार टँकर खाली करुन ते परस्पर संबंधित टँकरच्या मालकांच्या ताब्यात देण्याबाबत त्यांच्या स्तरावर कार्यवाही चालू आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वडाळा पोलिस ठाणे, मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ३१/१०/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ३१/१०/२०१२ रोजीच्या सुनावणीस वडाळा पोलिस ठाणेचे सहा. पोलिस उपनिरीक्षक श्री. अरुण रंगनाथ सुर्यगंध यांनी उपस्थित राहून वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस मोटर टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ चा मालक मोहम्मद जहिर सुभराती यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले. मोटर टँकर क्र. एमएच-०४-सीए-९७५५ शी संबंधित अशोक

कृष्णाप्पा पुजारी यांनी उपस्थित राहून लेखी निवेदन यापूर्वीच टपालामार्फत सादर केल्याचे सांगितले. सदर सुनावणीस मुक्तार मोहमद शेख व महमद मुस्तफा बशीर अहमद हे उपस्थित राहिले व त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगून लेखी निवेदन सादर केले नाही. तसेच सदर सुनावणीस मोटर टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ चा मालक यांच्या वतीने ॲड. तुलशीदास गोळे हे उपस्थित राहिले व त्यांनी वकालतनामा तसेच लेखी निवेदन सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. तथापी, सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी हे उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २०/११/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस ॲड. तुलशीदास गोळे हे मोटर टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ चा मालक तथा मे. ब्रिजदा रोडलाईन्स यांच्या वतीने उपस्थित राहिले व यापूर्वी वाचावे क्र. ९ अन्वये सादर केलेले निवेदन कायम असल्याचे सांगितले. मे. ब्रिजदा रोडलाईन्सच्या वतीने प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून जाफर अली शेख हे प्राधिकारपत्रासह उपस्थित राहिले. मोटर टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ मधील जप्त साठ्याचे मालक मे. युनायटेड इंडस्टीज या कंपनीचे वतीने प्राधिकृत प्रतिनिधी हरीश कुमार वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ११ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस इतर दोन्ही टँकरमधील जप्त साठ्याचे मालक व इतर आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलिस अधिकारी उपस्थित राहिले नाहीत. मे. युनायटेड इंडस्ट्रीजचे प्रतिनिधी यांनी सुनावणीच्या वेळी टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ मधील साठा हा मे. एच.पी.सी.एल. कंपनीचा असल्याचे सांगितले. सबब, सदर सुनावणीस अनुपस्थित उर्वरीत आरोपी/अपचारी, साठा मालक तसेच, एच.पी.सी.एल. कंपनीचे अधिकारी यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ११/१२/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ११/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. साह पेट्रोलियमचे महाव्यवस्थापक श्री. एम.एस. शानबाग यांनी उपस्थित राहून टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ मधील जप्त साठ्याचे मालक असल्याचे सांगून त्यांच्या कंपनीच्या वतीने लेखी निवेदन व पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यासाठी दोन दिवसांची मुदत मागितली. तसेच सदर सुनावणीस टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ चे चालक नईम अहमद अैनुल्लाह अहमद यांनी उपस्थित राहून त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगून लेखी निवेदन सादर करण्यास नकार दिला. तथापी, सदर सुनावणीसही इतर आरोपी/अपचारी हे उपस्थित राहिले नाहीत.

तद्नंतर वाचावे क्र. १५ अन्वये प्राप्त झालेल्या जप्त मुद्देमालाच्या रासायनिक पृथ:करण अहवालात, Exhibit nos. 1 and 2 contain petroleum hydrocarbon oil having density at 32°C. 0.853 and flash pt-120°C respectively, Exhibit nos 3 to 9 contain petroleum hydrocarbon oil having density at

32°C. 0.867, 0.858, 0.850, 0.869, 0.861, 0.863, 0.857 and flash pt-140°C, 120°C, 160°C, 180°C, 200°C, 198°C, 200°C respectively, असे नमूद केले आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखुन ठेवण्यात आले.

**युक्तीवाद :-**

दिनांक ३१/१०/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित वडाळा पोलिस ठाणेचे सहा. पोलिस उपनिरीक्षक श्री. अरुण रंगनाथ सुर्यगंध यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे सादर केलेल्या अभिवेदनात, जप्त मोटार टँकर त्यांचे मालकांच्या ताब्यात देण्यास पोलिसांची खालील कारणास्तव सक्त हरकत आहे. १) सदर चोरी झालेले घटनास्थळावरुन ताब्यात घेण्यात आलेले तीन मो/टँकरमधून तसेच जप्त करण्यात आलेल्या सहा ड्रममधील तेलाचे नमुने पंचनाम्यात ताब्यात घेण्यात आलेले असून ते संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कलीना, मुंबई यांचेकडे तपासणी करीता पाठविण्यात आलेले असून त्याचा अहवाल प्राप्त होणे बाकी आहे. २) सदर तेल चोरीमध्ये ताब्यात घेण्यात आलेला मो/टँकर एकएच-०४-डीडी-३९५५ चा चालक कृपाशंकर महादेव सरोज, चालक याचे विरोधात पंतनगर पोलिस ठाणे, मुंबई येथे अशाप्रकारे तेलाची चोरी केल्याबद्दल गु.र.क्र. ९५/२०११ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेल्या असून तो सराईत तेल चोरी करणारा असल्याचे दिसून येत आहे. ३) सदर गुन्ह्यातील आरोपी नामे अन्वर मदार सय्यद उर्फ अन्वर लंगडा उर्फ अन्वर हटेला, चालक याचा पूर्वइतिहास पडताळला असता त्यांचे विरोधात यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.१८/२०१२ व गु.र.क्र. ३७/२०११ तसेच शिवडी पोलिस ठाणेत गु.र.क्र. १६/२०१२ अन्वये गुन्हे नोंद असल्याचा अभिलेख प्राप्त झालेला आहे. वरीलप्रमाणे ताब्यात घेण्यात आलेल्या मो/टँकरमधील तेल साठा हा ज्वालाग्राही असून त्यातून अल्पशा प्रमाणात तेल गळती होत आहे. तसेच पोलिस ठाणे परिसरात बीपीटी रहिवाशी वसाहत व पोलिस वसाहत असल्याने मो/टँकर व त्यातील तेलाची लवकरात लवकर निर्गती होणेबाबत किंवा मो/टँकर अन्य सुरक्षित ठिकाणी पार्क करुन ठेवण्याबाबत नागरीकाकडून लेखी तक्रार अर्ज प्राप्त झालेले आहेत. तर ताब्यात घेण्यात आलेल्या मो/टँकर व त्यातील तेल साठ्याची विल्हेवाट लावण्याबाबत योग्य ते आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक ३१/१०/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मोटर टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ चा मालक मोहम्मद जहिर सुभराती यांनी युक्तीवाद केला की, ते टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ चे मालक असून दिनांक २४/०९/२०१२ रोजी त्यांच्या ड्रायव्हरने नमूद टँकरमध्ये बेस ऑईलचा साठा भरुन घेतला होता. मे. विकास बल्क कॅरिअर्स व त्यांच्याकडे अधिकृत बिले व कागदपत्रे आहेत. दिनांक २४/०९/२०१२ रोजी रात्रौ ०८:३० ते ०९:०० च्या सुमारास त्यांचे टँकर ड्रायव्हर नईम अहमद यांनी नमुद टँकरमधुन बेकायदेशीररित्या ऑईल विक्री केल्याने वडाळा



IONING & DI… HE/…OFFI MUMBAI

पोलिस ठाणे यांनी अटक केली असुन सद्यस्थितीत ड्रायव्हर हा जामीनावर मुक्त असुन त्यांचे टँकर अद्याप वडाळा पोलिस ठाणे येथे जप्त असल्याचे नमुद केले आहे. टँकर ड्रायव्हरने केलेल्या गैरकृत्याबाबत त्यांना कोणतीही माहिती नाही. सदर टँकर हे त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे उदरनिर्वाहाचे एकमेव साधन असल्याने मानवतेच्या दृष्टीकोनातुन त्यांचा टँकर मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

मे. राजपुत कॅरियर्सचे तथा टँकर क्र. एमएच-०४-सीए-९७५५ चे मालक यांचे दिनांक ३१/१०/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, तो गेली ३० ते ३५ वर्षापासून राजपूत ट्रान्सपोर्ट कंपनी या नावाने राजपूत हाऊस, ओल्ड आटीओ जवळ, कामराज नगर, इस्टर्न एक्सप्रेस हायवे, घाटकोपर (पूर्व), मुंबई ७७ या ठिकाणी व्यवसाय करीत असून त्याच्याकडे सध्या गाड्या व टँकर आहेत. प्रत्येक कर्मचाऱ्यास सदर कंपनीकडून कामाची जबाबदारी झालेली असते त्या पध्दतीने प्रत्येक कर्मचारी आपल्या कामाची जबाबदारी पार पाडत असतो. त्याच्याकडे हिंदुस्थान पेट्रोलियम माझगांव हे बंदर ल्युब्रिकेंट प्लांट या कंपनीचे तेल वाहतुकीचे ठेकेदारी व त्या ठिकाणी त्याचे टँकर चालतात व प्रत्येक टँकरवर ड्रायव्हर अशी प्रत्येक गाडीवर १ व्यक्ती असते व ते लोक ठरल्याप्रमाणे मालाची ने आण करीत असतात. तसेच मालाची ने आण करण्याची जबाबदारी ड्रायव्हरची असते. दिनांक २४.०९.२०१२ रोजी त्याचा टँकर क्र. एमएच-०४-सीए-९७५५ १८००० लि. क्षमता हा राजेंद्रसिंग राजाराम सिंग हा माल वाहतूक करीत असताना तुमच्या प्रमाणे त्यास श्री. हिंदुराव गुलाबराव भिलारे व त्यांचे इतर साथीदार व वडाळा पो. ठाणे यांनी सायंकाळी ७ ते ७.१५ अनधिकृतरित्या ऑईल व त्यांच्यावर जीवनावश्यक वस्तू कायदा ३, ४, ७ व ३७९, २९५, ३४ भा.दं.वि. (रेग्युलशन ऑफ सप्लाय ड्रिस्टीब्युशन अॅन्ड प्रिव्हेन्सन ऑफ माल प्रॅक्टीसेस, अन्वये गुन्हा नोंद क्र. सीआर/३३५/१२ असा नोंद करण्यात आला आहे. प्रत्येक कर्मचाऱ्यास प्रत्येकाच्या कामाची जबाबदारी सोपविली जाते व त्या अनुषंगाने प्रत्येक कर्मचारीला आपल्या कामाची जबाबदारी व्यवस्थितरित्या पार पाडत असतो व त्यांचा दरमहा ठरलेला मोबदला दिला जात असतो. दिनांक २४.०९.२०१२ रोजी हिंदुस्थान पेट्रोलियम ऑईल कॉर्पोरेशन येथून एमएच-०४-सीअे-९७५५ कच्चे ऑयल भरुन राजेंद्रसिंग राजारामसिंग हा ड्राईव्हर सिलवासा येथे पोहचणे होते. परंतू सदरील टँकरमध्ये बिघाड झाल्यामुळे व स्वतःचा मोबाईल चार्ज नसल्यामुळे १ कि.मी. पुढे जाऊन कंपनीला संपर्क केला. कंपनीला संपर्क केल्यानंतर गाडीकडे आला असता त्या ठिकाणी गाडी आढळून आली नाही. सदर ठिकाणी चौकशी केली असता सदर गाडी पोलिस चौकीमध्ये ओढून नेल्याचे समजले. सदरहू हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन ऑईल भरल्यानंतर कंपनीद्वारे आऊटलेट व इनलेटला कुलूप लावले जाते व सदर लॉकच्या दोन चाव्या असतात एक चावी कंपनीकडे व दुसरी चावी वितरक कार्यालयात असते. तुमच्या म्हणणे नुसार गाडीचे सिल तोडण्यात आलेले आहे. परंतू सदरची गाडीच्या आऊटलेटला सिल नसून कंपनीचे लॉक लावण्यात आलेले आहे आणि सदरचे कंपनीचे लॉक पंचनामामध्ये शाबूत असल्याचे आढळते. सदर घटनास्थळी त्याचवेळेस ४ ते ५

टँकर उभे होते. सदरचे सर्व टँकर चौकशी करुन त्याच दिवशी सोडण्यात आले. परंतू त्याच्या टँकरचे लॉक शाबूत असताना देखील जाणुनबुजून त्याचे व त्याच्या कंपनीचे नाव बदनाम करण्यासाठी कटकारस्थान केले जात आहे अशी त्याला शंका वाटते आणि सदर कटकारस्थानमुळे त्याची गाडी पकडण्यात आलेली आहे. सदरहू व्यवहारात त्याचा किंवा त्याच्या कंपनीचा कोणताही प्रकारचा संबंध नाही. तसेच सदरहू त्याला व त्याच्या कंपनीला नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे सदरील गाडी व गाडीतील मुद्देमाल त्याला परत करण्यात यावे. परंतू यांच्याशी त्याचा किंवा त्याच्या कंपनीची कोणताही संबंध नाही कारण गाडीवर फक्त ड्रायव्हर हाच कार्यरत असतो व गाडी परत कंपनीकडे आणेपर्यंत गाडीची व मालांची जबाबदारी सर्वस्वी ड्रायव्हरचीच असते. दिनांक २४.०९.२०१२ पासून त्याची गाडी एमएच-०४-सीए-९७५५ व त्यातील ऑईल १८००० वडाळा पो. स्टेशनला जमा आहे. ती आजतागायत पर्यंत पोलिस स्टेशनला आहे. सदर हिंदुस्थान पेट्रोलियम ऑईल कंपनी व राजपूत ट्रान्सपोर्ट यातील करारानुसार विहित कालावधीमध्ये कंपनीचा माल निर्देशित स्थळी पोहचला नाही. तर कंपनीकडून सदर मालाची संपूर्ण किंमत मुद्देमालासह कंपनीच्या खात्यातून वर्ग करण्यात येते. अशाप्रकारे त्याचा व त्याच्या कंपनीचा कोणताही संबंध नसतानाही त्याला नाहक आर्थिक नुकसान व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. सदरील कार्यवाही दरम्यान कंपनीच्या वतीने कंपनीचे मॅनेजर श्री. अशोक पुजारी यांचे नावे कुळमुखत्यापत्र देण्यात आलेले आहे. त्यानुसार श्री. अशोक पुजारी हे कंपनीचे व्यवस्थापक म्हणून काम पाहत आहेत. तरी कृपया सदर गुन्ह्यातील जप्त केलेली गाडी क्र. एमएच-०४-सीए-९७५५ व त्यातील ऑईल १८००० लि. त्याला मुद्देमालासहीत कोणत्याही अटी व शर्तीवर परत करावा असे नमूद केले आहे.

मे. युनायटेड इंडस्ट्रिज यांचे दिनांक ०२/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, टँकर क्रमांक एमएच-०४-डीडी-३९५५ मधील रेसर-२ लो स्मोक ऑईलचा साठा मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या तेल कंपनीने त्यांच्या तळोजास्थित असलेल्या कंपनीसाठी क्रमांक १२००४६७८ दिनांक २२/०९/२०१२ अन्वये १७५५२.५०० लिटर्स साठा हा २० मिलि, ४० मिलि व ६० मिलि चे पाऊच बनविण्याकरीता स्टॉक ट्रान्सफर केला आहे. मागील ३७ दिवसांपासुन त्यांचा साठा पोलिस कस्टडीमध्ये असल्याने त्यांना मानसिक तसेच आर्थिक नुकसान काहीही कारण नसतांना सोसावे लागत असुन नैसर्गिक न्याय म्हणुन निष्पाप लोकांना दोषी धरणे चुकीचे आहे. त्यांचा प्लांट बंद असल्याने १० ते १५ गरीब कर्मचारी हे बसुन आहेत. त्यामुळे त्यांना मासिक पगार तसेच प्लांटचे भाडे व इतर बिले त्यांना भरावे लागत आहे. मे. एचपीसीएल या कंपनीसोबतच्या करारनाम्यानुसार विहीत कालावधीमध्ये सदर मालाचा पुरवठा न झाल्यास त्यांचे नुकसान होणार आहे. कंपनीकडे सदर आर्थिक नुकसान सोसण्याकरीता तेवढी क्षमता नसल्याने त्यांचा संपुर्ण व्यवसाय बंद होण्याची भिती आहे. त्यामुळे त्यांचा साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

टँकर क्र. एमएच-०४-सीए-९७५५ चा चालक राजेंद्र सिंह याचे दिनांक ०३/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, सदरील ट्रान्सपोर्ट राजपूतमध्ये तो गेली तीन वर्षापासून ड्रायव्हर म्हणून काम करतो. त्याचे कर्तव्य म्हणजे ऑईल कंपनीमधून भरुन ते ज्या ठिकाणी मागणी आहे. त्या ठिकाणी पोहचविणे हे त्याचे काम असते. तोपर्यंत गाडी व मालावर त्याचा ताबा असतो. सदरील ऑईल म्हणजेच बेस ऑईल (कच्चे तेल) हे हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशनमधून ऑईल भरुन ते सिल्वासा या ठिकाणी गाडी क्र. एमएच-०४-सीए-९७५५ पोचवायची त्याची जबाबदारी होती. दिनांक २४.०९.२०१२ रोजी ऑईल भरुन सिल्वासाकडे जात असताना गोदरेज कंपनीच्या रोडला गाडीमध्ये बिघाड झाल्याचे लक्षात आले. त्यामुळे सेंटर रोड, जुने बी.पी.टी. सब स्टेशन समोर वडाळा पूर्व, मुंबई ३७ या ठिकाणी उभे केले. सदरील वेळी त्याच्याजवळील मोबाईल चार्ज नसल्यामुळे बंद पडला होता. सदरील घटना त्याच्या राजपूत ट्रान्सपोर्टला सांगण्यासाठी टेलिफोन बुथ शोधून माहिती घेण्यासाठी निघून गेलो. नंतर थोड्या वेळाने त्या ठिकाणी आलो असता त्याची गाडी एमएच-०४-सीए-९७५५ तेथे आढळून आली नाही. सदरील गाडी ही त्या ठिकाणी उभ्या असलेल्या दोन गाड्यासोबत घेऊन पोलिसांनी कार्यवाही करण्यात आल्याचे कळले. सदरील प्रकरणामध्ये जी गाडी व माल आहे तो ट्रान्सपोर्ट राजपूत यांना देण्यास त्याची काहीही हरकत नाही, असे नमूद केले आहे.

मे. ब्रिजदा रोडलाईन्स प्रा.लि. तथा टॅकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ चे मालक यांचे दिनांक ०९/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, त्यांची कंपनी नोंदणीकृत असुन त्यांचा विविध कंपन्यांना ऑईलचा पुरवठा करण्याची वाहतुकदार म्हणुन ते करारबध्द आहेत. त्यांचेकडे विविध क्षमतेचे टँकर वाहतुकीसाठी असुन ते टँकरचालकास दैनिकरित्या पगार देत असल्याने त्यांनी नेमणुक केलेले ड्रायव्हर कंपनीचे अधिकृत कर्मचारी नसल्याने ड्रायव्हरने वैयक्तिक पातळीवर केलेल्या गैरकृत्याबाबत त्यांची कंपनी जबाबदार नाही. दिनांक २४/१०/२०१२ रोजी नमुद टँकरमध्ये १७७५२.५०० लिटर रेसर-२ लो स्मोक हा लुब्रीकेटींग ऑईलचा साठा मे. एचपीसीएल कंपनीतुन मे. युनायटेड इंडस्ट्रिज यांच्या तळोजास्थित कंपनीत पोहोच करण्यासाठी निघाला असतांना वडाळा पोलिस ठाणे येथील अधिकाऱ्यांनी त्यांचे टँकरमधील साठा काही इसम चोरी करीत असतांना मिळुन आल्याने जप्त केले आहे. सदर प्रकरणी ड्रायव्हर यास अटक करण्यात आले असता मा. न्यायालय यांनी त्यास जामीनावर मुक्त केले आहे. त्यानंतर त्यांच्या कंपनीकडून सदर पोलिस ठाणे येथे तात्काळ संपर्क साधण्यात आले व त्यांना साठा व टँकर संबंधी वैध कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आले. कंपनीच्या वतीने मा. न्यायालयात त्यांचे टँकर व त्यामधील साठा परत करण्याबाबत अर्ज केले असता, त्यांचे अर्ज सुनावणी अंती दिनांक २३/१०/२०१२ रोजी फेटाळण्यात आले. वडाळा पोलिस ठाणे यांनी चुकीच्या पध्दतीने निष्कर्षाप्रत येवून टँकर जप्त केले असुन सर्व पुरावादर्शक वैध कागदपत्रे असतांनाही जीवनावश्यक वस्तु कायदयाचा जबरदस्तीने वापर केला आहे. नमुद

टँकरमधील साठा हा एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी केवळ हस्तांतर करावयाचे असुन तो साठा विक्रीसाठी नसल्याची बाब इन्व्हॉईसमध्ये नमुद आहे. जप्त साठा हा सरकारी तेल कंपनीचा असुन तो जीवनावश्यक वस्तुंच्या यादीत समाविष्ट नाही. त्यामुळे सर्व पेट्रोलियम पदार्थ हे जीवनावश्यक वस्तुंच्या तरतुदीमध्ये आणल्यास त्यांना व्यवसाय करणे कठीण होईल. व त्यांची वाहने पेट्रोलियम पदार्थाशिवाय धावणे शक्य नाही. टँकरचे ड्रायव्हर यांनी केलेल्या गैरकृत्यास त्यांची कंपनी जबाबदार नाही. सबळ कारणाशिवाय त्यांचे टँकर रोखुन धरल्यास त्यांच्या कंपनीचे तसेच शासनाचे आर्थिक नुकसान होणार असल्याने टँकर व त्यामधील साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे दिनांक २१/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, भारतीय सरकारची अंगिकृत असलेली कंपनी असुन ते पेट्रोलियम तसेच लुब्रिकंटचा व्यवसाय करीत आहेत. मे. राजपुत कॅरियर्स हे बेस ऑईलचा साठा त्यांच्या माझगांव प्लांटमधुन इतर ठिकाणी तसेच त्यांच्या सिल्व्हासा ल्युब प्लांट येथे वाहतुक करण्यासाठी प्राधिकृत वाहतुकदार आहेत. नेहमीप्रमाणे दिनांक २४/०९/२०१२ रोजी मे. राजपुत कॅरियर्स यांनी त्यांचे टँकर क्रमांक एमएच-०४-सीए-९७५५ मध्ये बेसऑईलचा साठा त्यांच्या सिल्व्हासा ल्युब प्लांट येथे पोहोच करण्यासाठी भरुन घेतला होता. तद्नंतर मे. राजपुत कॅरियर्स यांनी त्यांच्या कंपनीस अवगत केले की, दिनांक २४/०९/२०१२ रोजी रात्रौच्या वेळी वडाळा पोलिसांनी नमुद टँकर जप्त केले आहे. सदर टँकरमधील साठा हा एचपीसीएल कंपनीच्या मालकीचा असुन तो तात्काळ सिल्व्हासा ल्युब प्लांट येथे पोहचविणे गरजेचे असल्याने सदर टँकरमधील साठा हा मे. राजपुत कॅरियर्स यांना घेण्यास व सिल्व्हासा ल्युब प्लांट येथे पोहोच करण्यास ते प्राधिकृत करीत असुन सदर साठा त्यांच्या कंपनीस परत मिळाल्यास आपल्या कार्यालयास अवगत करु असे नमुद करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

मे. विकास बल्क करिअर्स यांचे दिनांक ०६/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, मोहम्मद जहिद सुब्राती हे टँकर क्रमांक एमएच-०४-सीजी-४८९४ चे मालक असुन त्यांचा टँकर हा विकास बल्क कॅरिअर्स मध्ये संलग्न असल्याचे ते प्रमाणीत करीत आहेत. सदर टँकरमधील बेस ऑईलचा साठा हा मे. साह पेट्रोलियम लि. यांनी निर्देशित केल्यानुसार मे. साह कानजी नरसी, शिवडी येथे पोहोच करावयाचा होता असे नमुद करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

मे. साह पेट्रोलियम लि. यांचे दिनांक १३/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, त्यांच्या कंपनीने १७४२.३४१ मे. टन बेस ऑईलचा साठा मे. स्टार ऑईल, युक्रेन येथुन आयात केला असुन सदर आयात साठयापैकी टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ मधील साठा हा मुंबई पोर्ट येथुन त्यांच्या वसई येथील प्लांटमध्ये घेऊन जात असतांना वडाळा पोलिस ठाणे यांनी जप्त केला आहे. सदर साठा त्यांची कंपनी विविध औद्योगिक आणि वाहनाच्या

लुब्रिकंटच्या उत्पादनासाठी वापर करीत असल्याने नमुद टँकरमधील बेस ऑईलचा साठा त्यांना वसई येथील प्लॉटमध्ये घेऊन जाण्यासाठी लवकरात लवकर परवानगी देण्यात यावी असे नमुद करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २४/०९/२०१२ रोजी सहाय्यक पोलिस आयुक्त वडाळा विभाग श्री. वाघमारे यांच्या अधिपत्त्याखाली वडाळा पोलिस ठाणे येथील पोलिस पथकाने गोदरेज कंपनीच्या पाठीमागे नॉलेज सेंटर रोड, जुने बी.पी.टी. सब स्टेशन, वडाळा पूर्व, मुंबई ३७ या ठिकाणी धाड टाकून टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५, क्र. एमएच-०४-सीए-९७५५ व क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ या तीन टँकरमधून बेकायदेशिररित्या पेट्रोलियम पदार्थाचा साठा चोरी करीत असल्याचे आढळून आल्याने सर्व संबंधितांविरुध्द वडाळा पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. १३५/२०१२, दिनांक २५/०९/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन सदर तीन टँकर व त्यामधील पेट्रोलियम पदार्थाचा साठा तसेच घटनास्थळी २०० लिटर क्षमतेचे सहा तेलाने भरलेले ड्रम व इतर मुद्देमाल असा एकूण ९०,८०,२०३/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मे. युनायटेड इंडस्ट्रिज या कंपनीच्या वतीने सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, जप्त टँकर क्रमांक एमएच-०४-डीडी-३९५५ मधील रेसर-२ लो स्मोक ऑईलचा साठा मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या तेल कंपनीने त्यांच्या तळोजास्थित असलेल्या कंपनीस २० मिलि, ४० मिलि व ६० मिलि चे पाऊच बनविण्याकरीता स्टॉक ट्रान्सफर केला आहे. मे. एचपीसीएल या कंपनीसोबतच्या करारनाम्यानुसार विहीत कालावधीमध्ये सदर मालाचा पुरवठा न झाल्यास त्यांचे नुकसान होणार आहे. कंपनीकडे सदर आर्थिक नुकसान सोसण्याकरीता तेवढी क्षमता नसल्याने त्यांचा संपुर्ण व्यवसाय बंद होण्याची भिती आहे. त्यामुळे त्यांचा साठा मुक्त करण्याची विनंती केली. मे. युनायटेड इंडस्ट्रिज यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, ते मे. एचपीसीएल या तेल कंपनीसोबत करारबध्द असुन त्यानुसार सदर तेल कंपनीकडुन स्टॉक ट्रान्सफरद्वारे मिळालेल्या सुटा साठयाचे विविध क्षमतेच्या पाऊचमध्ये पॅकिंग करुन देण्याची त्यांच्यावर जबाबदारी आहे. सदर स्टॉक ट्रान्सफर साठयाच्या पुराव्यादाखल मे. एचपीसीएल कंपनीने दिनांक २२/०९/२०१२ रोजी निर्गमित केलेल्या डॉक नं १२००४६७८ अन्वये १७७५२.५०० लिटर साठा चलनाद्वारे हस्तांतरीत केल्याचे दिसुन येते. यावरुन अभिलेखावरील उपलब्ध

कागदपत्रांचे अवलोकन करता, मे. युनायटेड इंडस्ट्रिज यांचा टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ मधील जप्त करण्यात आलेला रेसर-२ लो स्मोक ऑईलचा साठा हा मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या तेल कंपनीचा मालकीचा असल्याचे तसेच सदरचा साठा हा वैध असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

मे. हिन्दुस्तान पेट्रोलियंम कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे टपालामार्फत प्राप्त निवेदनात, मे. राजपुत कॅरियर्स हे बेस ऑईलचा साठा त्यांच्या माझगांव प्लांटमधुन इतर ठिकाणी तसेच त्यांच्या सिल्व्हासा ल्युब प्लांट येथे वाहतुक करण्यासाठी प्राधिकृत वाहतुकदार आहेत. सदर टँकर क्रमांक एमएच-०४-सीए-९७५५ मधील साठा हा एचपीसीएल कंपनीच्या मालकीचा असुन तो तात्काळ सिल्व्हासा ल्युब प्लांट येथे पोहचविणे गरजेचे असल्याने सदर टँकरमधील साठा हा मे. राजपुत कॅरियर्स यांना घेण्यास व सिल्व्हासा ल्युब प्लांट येथे पोहोच करण्यास ते प्राधिकृत करीत असुन सदर साठा त्यांच्या कंपनीस परत मिळाल्यास आपल्या कार्यालयास अवगत करु असे नमुद केले. मे. एचपीसीएल या कंपनीने मे. राजपुत कॅरियर्स या वाहतुकदारामार्फत सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, नमुद टँकरमधील साठा हा दिनांक २४/०९/२०१२ रोजी डॉक क्र. १२००४७०७ अन्वये मे. एचपीसीएल या तेल कंपनीच्या सिल्व्हासा येथील ल्युब प्लांटमध्ये पाठविण्याकरीता स्टॉक ट्रान्सफर केल्याचे चलनाद्वारे दिसुन येते आहे. यावरुन अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता, मे. राजपुत कॅरियर्स यांचा टँकर क्र. एमएच-०४-सीए-९७५५ मधील जप्त करण्यात आलेला १५० सॉल्व्हंट न्युट्रल ऑईलचा साठा हा मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या तेल कंपनीचा मालकीचा असल्याचे तसेच सदरचा साठा हा वैध असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

मे. साह पेट्रोलियम लि. या कंपनीच्या वतीने सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, त्यांच्या कंपनीने १७४२.३४१ मे. टन बेस ऑईलचा साठा मे. स्टार ऑईल, युक्रेन येथुन आयात केला असुन सदर आयात साठयापैकी टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ मधील साठा हा मुंबई पोर्ट येथुन त्यांच्या वसई येथील प्लांटमध्ये घेऊन जात असतांना वडाळा पोलिस ठाणे यांनी जप्त केला आहे. सदर साठा त्यांची कंपनी विविध औद्योगिक आणि वाहनाच्या लुब्रिकंटच्या उत्पादनासाठी वापर करीत असल्याने नमुद टँकरमधील बेस ऑईलचा साठा त्यांना वसई येथील प्लाँटमध्ये घेऊन जाण्यासाठी लवकरात लवकर परवानगी देण्यात यावी असे सांगितले. मे. साह पेट्रोलियम या कंपनीने सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्रमांक ७८७४९५३ अन्वये २२५०.००० मे.टन बेस ऑईल एसएन-५०० चा सुटा साठा आयात केल्याचे दिसुन येते. तसेच सदरचा साठा आयात करुन त्यापासुन वाहन व इतर औद्योगिक वापराच्या ऑईलच्या उत्पादनाकरीता उपयोग केला जात असल्याचे दिसुन येते. यावरुन अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता, मे. विकास बल्क करिअर्स यांच्या

अधिपत्याखालील टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ मधील जप्त करण्यात आलेला बेस ऑईल एसएन-५०० चा साठा हा मे. साह पेट्रोलियम लि. या कंपनीच्या मालकीचा असल्याचे तसेच सदरचा साठा हा वैध असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालात तीनही टँकरमधील साठा हा petroleum hydrocarbon oil असे नमुद असुन यापुर्विच्या गुन्हा नोंद प्रकरणामध्ये पदार्थाचे Definition बाबत संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्याकडून प्राप्त झालेल्यां अहवालात, This oils may be used as Transformer oil base stock असे नमूद केले आहे. यावरुन टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ व टँकर क्र. एमएच-०४-सीए-९७५५ मधील जप्त करण्यात आलेला मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या तेल कंपनीच्या मालकीचा बेस ऑईलचा साठा तसेच टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ मधील जप्त करण्यात आलेला बेस ऑईल एसएन-५०० चा साठा हा मे. साह पेट्रोलियम लि. या कंपनीच्या मालकीचा साठा हा उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता वैध असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, जप्त करण्यात आलेल्या टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ व टँकर क्र. एमएच-०४-सीए-९७५५ मधील संपुर्ण साठा हा मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या तेल कंपनीस तसेच टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ मधील जप्त करण्यात आलेला साठा हा मे. साह पेट्रोलियम लि. या कंपनीस क्षतीपुर्ती बंधपत्र घेऊन परत करण्याच्या निष्कर्षाप्रत [illegible] आलेली आहे.

प्रस्तुत गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या तीन टँकरपैकी टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ हे मे. ब्रिजदा रोडलाईन्स प्रा.लि., टँकर क्र. एमएच-०४-सीए-९७५५ हे मे. राजपुत कॅरियर्स व टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ हे मे. विकास बल्क कॅरियर्स या वाहतुकदारांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत. त्यापैकी मे. ब्रिजदा रोडलाईन्स प्रा.लि. व मे. राजपुत कॅरियर्स या दोन्ही वाहतुकदारांच्या स्वत:च्या मालकीचे टँकर्स असुन टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ हे मोहम्मद जहीर सुब्राती यांच्या मालकीचे आहे. उपरोक्त तीनही टँकर मधुन अनधिकृतरित्या पेट्रोलियम पदार्थाचा साठा गैरमार्गाने विक्रीकरीता काढत असतांना पोलिसांनी रंगेहाथ पकडले आहे. सदर प्रकरणी, यापूर्वी या कार्यालयामार्फत तसेच पोलिसांमार्फत टाकण्यात आलेल्या धाडींमध्ये विविध टँकरचे चालक/क्लिनर हे नियोजीत ठिकाणी न जाता अनधिकृत ठिकाणी टँकर नेवून तेथील गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांशी संगनमत करुन त्यांच्या ताब्यात असलेल्या टँकरमधील पेट्रोलियम पदार्थाचा साठा काढून गैरमार्गाने खुलेआम विक्री करीत असल्याचे दिसुन आले. सदर गैरप्रवृत्तीस आळा घालण्याची जबाबदारी मुळ प्राधिकृत वाहतुकदारांची आहे. तथापी, नेहमीप्रमाणे वाहतुकदारांनी या ही गुन्हा नोंद प्रकरणी अत्यंत बेजबाबदारपणे त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत

टँकर चालकांवर झालेल्या गैरकृत्याची जबाबदारी सोपवून अक्षम्य निष्काळजीपणा दाखविला असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सबब, सदर गुन्हा नोंद प्रकरणी वाहतुकदार अथवा तीनही टँकरचे मालक यांनी त्यांचा या गैरप्रवृत्तीशी काहीही संबंध नसल्याचे सांगुन त्यांनी या कार्यालयाची दिशाभूल करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसून येते. नमुद तीनही टँकरमधील भरण्यात आलेला बेस ऑईल या पेट्रोलियम पदार्थाचा साठा हा नियोजीत ठिकाणी व जसाच तसा वितरण करण्याची जबाबदारी वाहतुकदार व टँकरचे मालक यांची आहे. वास्तविक पाहता टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५, टँकर क्र. एमएच-०४-सीए-९७५५ व टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ या तीनही टँकरच्या चालकाने सदरचा साठा भरुन नियोजित ठिकाणी न जाता घटनास्थळी जाऊन नमूद तीनही टँकरमधील बेस ऑईलचा साठा हा इतर इसमांच्या संगणमताने अनधिकृतरित्या काढीत असतांना पोलिस पथकाने रंगेहात पकडले आहे. या सर्व घटनाक्रमाचे अवलोकन करता, वाहतुकदार अथवा टँकर मालक यानी वाहतूकीची जबाबदारी पार पाडताना अक्षम्य निष्काळजीपणा दाखवून फक्त टँकर चालकास जबाबदार धरले आहे. जप्त तीनही टँकर मधील बेस ऑईलचा साठा प्रत्यक्षात उपभोक्त्यास न देता स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी गैरमार्गाने सदर टँकरच्या चालकाने काढल्याचे आढळून आल्याने या गैरकृत्यास अप्रत्यक्षरित्या वाहतुकदार अथवा टँकर मालक हेही जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. प्रस्तुत प्रकरणी टँकर मालकांच्या अपरोक्ष जरी चालक यांनी त्यांचे वाहनांचा गैरवापर केला असला तरी वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनांचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर टँकरच्या प्रत्येकी बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास टँकरचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरचे टँकर त्यांच्या मालकांस परत करण्याचा अथवा टँकरचे मालक तेवढी प्रत्येकी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरचे तीनही टँकर जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी धाडीच्या वेळी घटनास्थळी जप्त करण्यात आलेले २०० लिटर क्षमतेच्या ६ तेलाने भरलेले ड्रम मधील १२०० लिटर साठा, ५ नग रिकामे लोखंडी ड्रम, १ नग पत्र्याचे नरसाळे, ३ नग इंग्रजी 'L' आकाराचे व्हॉल्व्हनाईजड पाशाचे बेंड, १ नग काळ्या रंगाची प्लास्टीक बादली, १ नग रिंगपाना H TOP कंपनीचा २४/२७ आकाराचा इ. इतर मुद्देमाल शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये वडाळा पोलिस

HEAD OFFI... MUMBAI

ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १३५/२०१२, दिनांक २५/०९/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी, जप्त करण्यात आलेल्या मोटार टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ व टँकर क्र. एमएच-०४-सीए-९७५५ या दोन्ही टँकरमधील संपुर्ण ऑईलचा साठा हा मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या तेल कंपनीस पोलीसांनी क्षतीपुर्ती बंधपत्र घेऊन परत करावा.

२) प्रस्तूत प्रकरणी, जप्त करण्यात आलेल्या मोटार टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ या टँकरमधील संपुर्ण ऑईलचा साठा हा मे. साह पेट्रोलियम लि. या कंपनीस पोलीसांनी क्षतीपुर्ती बंधपत्र घेऊन परत करावा.

३) जप्त करण्यात आलेले मोटार टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५, टँकर क्र. एमएच-०४-सीए-९७५५ व टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ हे तीनही वाहने शासनजमा करण्यात येत आहेत. सदर वाहनांच्या प्रत्येकी बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास वाहनांचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहने त्यांच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनांच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

४) अथवा वाहनांचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

५) जप्त करण्यात आलेले २०० लिटर क्षमतेच्या ६ तेलाने भरलेले ड्रम मधील १२०० लिटर साठा हा शासनजमा करण्यात यावा. सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

६) घटनास्थळी जप्त करण्यात आलेले ५ नग रिकामे लोखंडी ड्रम, १ नग पत्र्याचे नरसाळे, ३ नग इंग्रजी 'L' आकाराचे व्हॉल्व्हनाईजड पाशाचे बेंड, १ नग काळ्या रंगाची प्लास्टीक बादली, १ नग रिंगपाना H TOP कंपनीचा २४/२७ आकाराचा तसेच ६ रिकामे होणारे ड्रम इ. वस्तू शासनजमा करण्यात यावी. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मुक्तार मोहमद शेख
२) मोटर टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ चा चालक नईम अहमद ऐनूल्ला अहमद
३) मोटर टँकर क्र. एमएच-०४-सीजी-४८९४ चा मालक
४) मोटार टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ चा चालक कृपाशंकर महादेव सरोज
५) मोटर टँकर क्र. एमएच-०४-डीडी-३९५५ चा मालक
~~६) मोटर टँकर क्र. एमएच-०४-सीए-९७५५ चा मालक~~
७) बबलू
८) मुस्तफा आणि त्यांचे दोन साथीदार
९) मे साह पेट्रोलियम लि.
१०) चिफ टर्मिनल मॅनेजर, मे. एच.पी.सी.एल. कंपनी, माझगांव, हे बंदर कॉम्पेक्स, हे बंदर रोड, मुंबई - ३३
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वडाळा पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वडाळा पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

D:\user E\Amaldata-2012\Ammal Aadesh\Aadesh.doc